Since 1917

**THE KARAD URBAN CO-OPERATIVE BANK LTD., KARAD**
(SCHEDULED BANK)

Centenary Celebrated Bank

**Ref. No. HO/LOAN/103/2020-21/** **Date : 01/06/2020**

प्रति,

____________________

____________________

____________________

**विषय :- कॅश क्रेडीट कर्जावरील व्याज परतफेडीसाठी दिलेल्या विशेष मुदतीबाबत.**
**संदर्भ :- व्याज भरणेबाबत स्थगिती दिल्याबाबतचे दि.०३ एप्रिल २०२० रोजीचे पत्र.**

**महोदय,**

COVID-19 या कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे भारतभर सुरू असलेल्या लॉकडाऊनला ७० दिवसांपेक्षा अधिक काळ झाला आहे. जीवनावश्यक गोष्टी वगळून या काळात सर्वच उद्योगधंदे, व्यापार, कार्यालये, सेवा बंद आहेत. त्यामुळे अर्थचक्र ठप्प झाले आहे. याचा सम्यक विचार करून विशेष बाब म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने प्रथम तीन महिन्यासाठी (१ मार्च ते ३१ मे २०२०) आणि आता आणखी तीन महिने (१ जून ते ३१ ऑगस्ट २०२०) कॅश क्रेडीट कर्जावरील व्याज भरण्यास स्थगिती (Deferment) दिली आहे.

त्यानुसार बँकेच्या मा.संचालक मंडळाने कॅश क्रेडीट कर्ज खात्यावरील व्याज रक्कम भरण्यासाठी स्थगिती देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निश्चित केलेले आहे -

१. कॅश क्रेडीट कर्जखात्यांना यापूर्वी दि.१ मार्च २०२० ते दि.३१ मे २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीत नावे लिहिलेल्या व्याज रक्कमेइतकी कॅश क्रेडीट कर्जाची मर्यादा (Limit) व उचलपात्र मर्यादा (Drawing Power) वाढविण्यात आलेली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी सूचित केलेनुसार दि.०१ जून २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या आणखी तीन महिन्यांच्या म्हणजेच एकत्रित सहा महिन्यांच्या (दि.१ मार्च ते ३१ ऑगस्ट २०२०) कालावधीत नावे होणाऱ्या व्याज रक्कमेइतकी कॅश क्रेडीट कर्जाची मर्यादा (Limit) व उचलपात्र मर्यादा (Drawing Power) वाढविण्यात येईल.

२. दि.१ मार्च २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये कॅश क्रेडीट खात्यावर नावे पडलेले व पडणारे व्याज आपल्या सोयीनुसार दि.३१ मार्च २०२१ अखेर पूर्णपणे भरावे लागेल. तथापि दि.१ सप्टेंबर २०२० पासून कॅश क्रेडिट कर्ज खात्यावर नावे पडणारे मासिक व्याज आपणास नियमित भरावे लागेल.

३. कॅश क्रेडीट कर्जाची मर्यादा (Limit) व उचलपात्र मर्यादा (Drawing Power) ही दि.३१ मार्च २०२१ पासून कर्ज मंजुरीपत्रातील अटींनुसार पूर्ववत केली जाईल.

४. **आपल्याला कॅश क्रेडीट कर्जावरील व्याज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून स्थगिती (Deferment) ची आवश्यकता नसेल व आपण नियमित व्याज भरणार असाल तर, याबाबत संबंधित शाखेस तशी लेखी कल्पना द्यावी; जेणेकरून याबाबत उचित कार्यवाही करणे सोयीचे होईल.**

सदरच्या पत्रात नमूद केलेल्या कार्यवाहीमध्ये काही बदल/सुधारणा झाल्यास आपणास कळविण्यात येईल. आपल्याला सदर कार्यवाहीबाबत काही शंका/अडचणी असतील तर, श्री.गिरीश सिंहासने (महाव्यवस्थापक, कर्ज व जोखीम व्यवस्थापन विभाग) यांच्याशी भ्रमणध्वणी क्र.७३५०० १०७२२ वर संपर्क साधावा, ही विनंती.

आपल्या सहकार्याच्या अपेक्षांसह.....

**आपला स्नेहांकित,**

**(सीए. दिलीप गुरव)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

The Karad Urban Co-operative Bank Ltd. Karad
Registration No. Code No.0 Scheduled Bank
HEAD OFFICE, KARAD

**कॅश क्रेडिट कर्ज खात्यावरील व्याज भरण्यासाठी दिलेल्या स्थगिती (Deferment) सवलतीची आवश्यकता आहे / आवश्यकता नाही.**

**कॅश क्रेडिट कर्ज खातेदाराची सही-** ____________

**दिनांक :-** /०६/२०२०

HEAD OFFICE : 516/2, SHANIWAR PETH, KARAD-415 110
WEBSITE : www.karadurbanbank.com
TEL. : (02164) 226013, 226017
FAX : (02164) 220126, 221484

Scanned by CamScanner